# सायबर सुरक्षेसह जागरूकताही हवी

## राज्य सायबर सेलच्या अधीक्षकांचे मत

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे सुरक्षेबरोबरच सायबर जागरूकतेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही,' असे मत राज्य सायबर सेलचे पोलिस अधीक्षक संजय शिंत्रे यांनी व्यक्त केले.

'क्विक हील फाउंडेशन'च्या वतीने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा २०२४' च्या पुरस्कारांचे नुकतेच वितरण करण्यात आले. त्या वेळी शिंत्रे बोलत होते. जळगाव येथील कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू व्ही.



एल. महेश्वरी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश ए. महानवार, 'क्विक हील फाउंडेशन'च्या अध्यक्ष अनुपमा काटकर आदी या वेळी उपस्थित होते. 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या कार्यक्रमामध्ये सहभागी शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना या वेळी सन्मानित करण्यात आले. सायबर सुरक्षा वॉरियर्स (विद्यार्थी), सायबर सेफ्टी चॅम्पियन (शिक्षक) आणि सायबर शिक्षा चॅम्पियन ऑफ दी इयर (संस्था) या श्रेणीतील पुरस्कार देण्यात आले.

'क्विक हील फाउंडेशन सामान्य जनतेला सायबर गुन्ह्यांबाबत जागरूक राहण्यास मदत करीत आहे. त्यांचे हे काम वाखाणण्याजोगे आहे. आपल्या देशाला सायबर साक्षर करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे मी अभिनंदन करतो. 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमातून त्यांची सायबर सुरक्षितेबाबतची जाणीव दिसून येत,' असे शिंत्रे म्हणाले.

'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमाशी संलग्न असण्याचा आनंद होत आहे. हा उपक्रम सायबर सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण माहिती देतो. या माध्यमातून सायबर सुरक्षेचा पाया रचला जात आहे, असे महेश्वरी म्हणाले.